लोकमत दि 22.8.25

मस्ट READ

# अगोदर तरुणीची छेड, नंतर हात जोडून माफी

## तरुणीने तक्रार देताच पोलिसांनी दोघांना पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** जिल्ह्यात महिला आणि मुलींच्या छेडखानीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिस दलाकडून मिशन निर्भया सुरु करण्यात आले आहे. त्यावर तक्रारीसाठी वेगवेगळ्या ठिकाणी क्यूआर कोड आणि अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक देण्यात आले आहेत. नांदेड शहरात पायी जात असलेल्या एका तरुणीची दुचाकीवरून दोघांनी छेड काढली होती. तरुणीने तक्रार देताच ग्रामीण पोलिसांनी दोघाही तरुणांचा शोध घेऊन समाचार घेतल्यानंतर त्यांनी सोशल मीडियावर हात जोडून माफी मागितली.



पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी महिला आणि मुलींच्या छेडखानीच्या घटनांना प्रतिबंध बसावा म्हणून निर्भया मिशन सुरु केले आहे. या अभियानाच्या जनजागृतीसाठी शाळा, महाविद्यालये, खाजगी कोचिंग क्लासेस या ठिकाणी जनजागृती शिबिरेही घेण्यात आली आहेत. छेड काढल्यास त्वरित तक्रारीसाठी क्यूआर कोडही दिले आहेत. तक्रार केल्यानंतर पीडितेचे नाव गोपनीय ठेवण्यात येत आहे. बुधवारी ग्रामीण हद्दीत पायी जात असलेल्या एका तरुणीची दुचाकीवरील दोघांनी छेड काढली होती. त्यानंतर तरुणीने त्या तरुणांचा व्हिडीओ तयार करुन लगेच पोनि. ओमकांत चिंचोलकर यांना कळविले. काही तासांच्या आतच पोलिसांनी त्या दोघांचा शोध घेऊन चांगला प्रसाद दिला. त्यानंतर दोघांनीही हात जोडून माफी मागत पुन्हा असा प्रकार होणार नाही असे सांगितले.

**२०**
रोजी ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत काढली होती छेड

## क्यूआर कोड स्कॅन करून अशी करा तक्रार...

**१** जिल्हा पोलिस दलाकडून महिला आणि मुलींच्या छेडछाडीला प्रतिबंध घालण्यासाठी ऑपरेशन निर्भया सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या जनजागृतीसाठी मोठ्या प्रमाणात शिबिरेही घेण्यात आली आहेत.

**२** महाविद्यालय, कोचिंग क्लासेस तसेच शाळेच्या परिसरात पोलिसांनी क्यूआर कोड लावले आहेत. हे क्यूआर कोड स्कॅन करून थेट तक्रार करता येणार आहे. तक्रार दाखल होताच काही तासातच पोलिस त्याचा निपटारा करणार आहेत.